


औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकाऊंटंटच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत निवडण्यात आलेली कार्यकारिणी एस. बी. खडके, एस. के. जैन, आर. पी. गोरे, जी. आर. कुलकर्णी, आर. बी. शुक्ला, एस. एस. खेकाळे आणि इतर सदस्य.

# 'कॉस्ट अकाऊंटंट'चे एस. बी. खडके अध्यक्ष

औरंगाबाद, ता. १० : औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकाऊंटंटच्या अध्यक्षपदी एस. बी. खडके यांची निवड करण्यात आली. हॉटेल प्रेसिडेंट पार्कमध्ये रविवारी (ता. ३०) झालेल्या चौदाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ही निवड करण्यात आली. चॅप्टरचे मावळते अध्यक्ष नितीन शर्मा यांनी स्वागत केले. 'आयसीडब्ल्यूए'चा अंतिम कोर्सही यंदापासून सुरू होत असल्याचे आणि ग्रंथालय, वाचनकक्ष; तसेच संगणक आदी सुविधांत वाढ करण्यात आल्याचे या वेळी सांगण्यात आले. वार्षिक लेखे स्वीकारल्यानंतर मागील समितीचे विसर्जन झाले. निवडणूक अधिकारी म्हणून एस. आर. पिंपळे यांनी काम पाहिले. आर. बी. शुक्ला यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. कार्यकारिणी अशी : उपाध्यक्ष - आर. पी. गोरे, एस. के. जैन, कोषाध्यक्ष - जी. आर. कुलकर्णी, सचिव - आर. बी. शुक्ला, सहसचिव - एस. एस. खेकाळे, शैक्षणिक समिती सदस्य - ए. आर. जोशी, डी. व्ही. डाबरी, व्यवसाय विकास समिती - अध्यक्ष एम. आर. पंडित, सदस्य - एस. आर. पिंपळे, के. सी. नाईक. कार्यकारी समिती सदस्य - आर. जी. मोदाणी, एस. के. वाया, पी. के. खेमका, एन. आर. शर्मा.